# MAHARASHTRA ACT No. XXI OF 1974

## THE MAHARASHTRA TAX ON LUXURIES (IN HOTELS AND LODGING HOUSES) ACT, 1974

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमति दिनांक २७ एप्रिल १९७४ रोजी मिळाली असल्यामुळे तो याद्वारे, सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

बी. पी. दलाल,
सचिव,
महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग.

# MAHARASHTRA ACT No. XXI OF 1974

## AN ACT TO PROVIDE FOR THE LEVY AND COLLECTION OF A TAX ON LUXURIES PROVIDED IN HOTELS AND LODGING HOUSES

[ राज्यपाल यांची संमति मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक २९ एप्रिल १९७४ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ]

## सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१

**हॉटेल्स व निवासगृहे यांमध्ये पुरविण्यात येणाऱ्या ऐषआरामावर कर बसविणे व तो वसूल करणे यांसाठी तरतूद करण्याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** हॉटेल्स व निवासगृहे यांमध्ये पुरविण्यात येणाऱ्या ऐषआरामावर कर बसविणे व तो वसूल करणे यांसाठी व उपरोक्त प्रयोजनांशी संबंधित असलेल्या बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पंचविसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ति आणि प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र (हॉटेल्स व निवासगृहे यांमधील) ऐषआरामावरील कर अधिनियम, १९७४ असे म्हणता येईल,

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल ;

(३) तो, राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमील अशा तारखेस अंमलात येईल.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,— व्याख्या.

(अ) "जिल्हाधिकारी" या संज्ञेमध्ये, या अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्याच्या शक्तींचा वापर करण्यासाठी व त्याची कामे पार पाडण्यासाठी राज्य शासनाकडून नियुक्त करण्यात येणाऱ्या अधिकाऱ्याचा समावेश होईल ;

(ब) "हॉटेल" म्हणजे, जेथे व्यवसाय म्हणून पैशाच्या मोबदल्यात निवासी जागा उपलब्ध करून दिली जाते अशी इमारत किंवा अशा इमारतीचा भाग व त्यामध्ये निवासगृहाचा समावेश होईल ;

(क) "हॉटेलमध्ये पुरविण्यात आलेला ऐषआराम" म्हणजे (अन्नपदार्थ, पेय यांचे आकार, तसेच पुरविण्यात येणाऱ्या सेवांसंबंधीचे इतर आकार वगळून) ज्या जागेसाठी दर दिवशी पन्नास रुपये किंवा त्याहून अधिक दराने आकारणी करण्यात येते अशी हॉटेलात पुरविण्यात येणारी निवासी जागा ;

(ड) हॉटेलच्या संबंधात "मालक" या संज्ञेत, हॉटेलच्या व्यवस्थापनाचा प्रभार त्यावेळी जिच्याकडे असेल अशा व्यक्तींचा समावेश होईल ;

(ई) "विहित" म्हणजे, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित.

कर बसविणे व तो वसूल करणे. ३. (१) या अधिनियमाच्या उपबंधांस अधीन, हॉटेलकडून पुरविण्यात येणाऱ्या कोणत्याही ऐषआरामावर (यात यापुढे ज्यास "ऐषआराम कर" असे संबोधण्यात आले आहे) कर बसविण्यात येईल व तो वसूल करण्यात येईल.

(२) हॉटेलात निवास करणाऱ्या व्यक्तींकडून पुढील दरांनी ऐषआराम कर देय असेल, :—

| | |
|---|---|
| (अ) निवासासाठीचा आकार, दर दिवशी, प्रत्येक व्यक्तीस, पन्नास रुपये किंवा त्यापेक्षा अधिक असेल परंतु शंभर रुपयांपेक्षा अधिक नसेल त्याबाबतीत. | अशा आकाराच्या ३ टक्के ; |
| (ब) निवासासाठीचा आकार, दर दिवशी, प्रत्येक व्यक्तीस, शंभर रुपयांपेक्षा अधिक असेल परंतु एकशे पन्नास रुपयांपेक्षा अधिक नसेल त्याबाबतीत. | अशा आकाराच्या ५ टक्के ; |
| (क) निवासासाठीचा आकार, दर दिवशी, प्रत्येक व्यक्तीस एकशे पन्नास रुपयांपेक्षा अधिक असेल त्याबाबतीत. | अशा आकाराच्या ७ टक्के. |

परंतु, असे कोणतेही आकार, भारताच्या नागरिकाखेरीज कोणत्याही व्यक्तीकडून, कोणत्याही विदेशी चलनात देण्यात येईल त्याबाबतीत, अशा व्यक्तीस ऐषआराम कर देण्यापासून सूट देण्यात येईल :

आणखी असे की, दैनिक तत्त्वावर किंवा प्रती माणशी आकार बसविण्यात येतील त्याखेरीज अन्य रीतीने आकार बसविण्यात येतील त्याबाबतीत, या कलमाखालील करदायित्व निश्चित करण्यासाठीचे आकार, निवासाच्या भोगवटयाबद्दल ज्या मुदतीसाठी आकारणी करण्यात आली असेल ती मुदत आणि हॉटेलच्या नियमानुसार किंवा प्रथेनुसार प्रत्यक्ष भोगवटा करणाऱ्या किंवा भोगवटा करण्यास परवानगी दिलेल्या व्यक्तींची संख्या या आधारावर, प्रत्येक दिवसागणिक व प्रत्येक माणसागणिक मोजण्यात येतील.

(३) पूर्ववर्ती पोट-कलमांखालील ऐषआराम कर हा मालकाकडून वसूल करण्यात येईल व विहित करण्यात येईल अशा मुदतीत व अशा रीतीने, शासकीय कोषागारात किंवा भारताच्या रिझर्व्ह बँकेत त्याचा भरणा करण्यात येईल.

(४) या कलमाखालील ऐषआराम कराची गणना करताना, पाच पैशांच्या पटीत नसणाऱ्या रुपयाच्या भागाचे पाच पैशांच्या लगतपुढील पटींमध्ये पूर्णांकन करण्यात येईल.

विवरणे. ४. (१) या अधिनियमान्वये ऐषआराम कर देण्यास पात्र असणारा प्रत्येक मालक, विवरण ज्या महिन्याच्या संबंधात असेल तो महिना संपल्यापासून आठ दिवसांच्या आत विहित नमुन्यात जिल्हाधिकाऱ्याकडे विवरण सादर करील.

(२) अशा प्रत्येक विवरणात, विहित करण्यात येईल अशा इतर माहितीसह, भोगवटयात देण्याचा उद्देश असलेल्या हॉटेलातील खोल्यांची किंवा इतर जागांची संख्या ; अशा खोल्या किंवा जागा ज्यांनी भोगवटयात ठेवल्या असतील त्या व्यक्तींची संख्या, त्यांच्या मुक्कामाचा कालावधी, त्यांच्या आगमनाचा व प्रयाणाचा दिवस, त्यांच्याकडून वसूल करण्यात आलेल्या आकाराची रक्कम या गोष्टी दर्शविण्यात येतील.

(३) अशा प्रत्येक विवरणाबरोबर, विवरण ज्या कालावधीशी संबंधित असेल त्या कालावधीसंबंधातील ऐषआराम कराची पूर्ण रक्कम, शासनाच्या खाली शासकीय कोषागारात किंवा भारताच्या रिझर्व्ह बँकेत भरल्याबद्दलची पावती जोडण्यात येईल ;

(४) प्रत्येक विवरणाची, विहित रीतीने पडताळणी करण्यात येईल.

१६०

५. (१) कलम ४ खालील विवरण मिळाल्यावर, जिल्हाधिकारी, विवरण ज्या कालावधी- संबंधात असेल त्या कालावधीच्या बाबतीत देय असलेला ऐषआराम कर निर्धारित करील, व पूर्वोक्त प्रमाणे (कराच्या) रकमेचा पूर्वीच भरणा केलेला नसेल तर, तो, संबंधित मालकावर नोटीस बजाविण्याची व्यवस्था करून, उक्त नोटीस बजावल्यापासून दहा दिवसांमध्ये, निर्धारित केलेली कराची रक्कम भरण्याबद्दल त्यास फर्मावील. कर निर्धारण व वसुली.

(२) कलम ४ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले विवरण योग्य वेळी सादर करण्यात मालक कसूर करील तर, जिल्हाधिकारी, त्याला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, आपल्या पराकाष्ठा निर्णयशक्तीनुसार, देय असलेल्या ऐषआराम कराची रक्कम निर्धारित करील आणि नोटिशीसंबंधातील पोट-कलम (१) चे उपबंध, अशा मालकाने दिलेल्या विवरणाच्या आधारे असे निर्धारण करण्यात आले असल्याप्रमाणे, लागू होतील.

(३) विहित मुदतीच्या आत ऐषआराम कर देण्यात आला नसेल तर, जिल्हाधिकाऱ्यास, या अधिनियमान्वये देय असलेल्या ऐषआराम कराच्या रकमेच्या दीड पटीपेक्षा अधिक नसणारी रक्कम शास्ती म्हणून लादता येईल.

६. कलम ५ अन्वये केलेल्या निर्धारणाचा किंवा लादलेल्या शास्ती संबंधीचा आदेश देण्यात आल्यामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, आदेश मिळाल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत, त्याबाबतीत करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा अपील प्राधिकरणाकडे, निर्धारण किंवा शास्ती विलोपित करण्यासाठी किंवा तीत फेरबदल करण्यासाठी, अर्ज करता येईल आणि असा अर्ज करण्यात आल्यावर, विहित अपील प्राधिकरणास (त्या प्राधिकरणाकडून याबाबतीत करण्यात येतील अशा कार्यपद्धतीच्या नियमांस अधीन राहून) निर्धारण किंवा शास्ती कायम करता येईल, ती विलोपित करता येईल किंवा तीत फेरबदल करता येईल आणि निर्धारण किंवा शास्ती दाखल त्याने दिलेली संपूर्ण रक्कम किंवा यथास्थिती तिचा भाग, अशा व्यक्तीला परत करण्याबद्दल आदेश देता येईल. अपील.

७. (१) राज्य शासनास किंवा त्या शासनाने याबाबतीत संविधित केलेल्या (शासनाच्या उप-सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा) अधिकाऱ्यास, स्वाधिकारे किंवा अर्ज करण्यात आल्यानंतर, जिल्हाधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही आदेशाचे अभिलेख व कामकाज मागवून त्याची तपासणी करता येईल आणि शासनाला किंवा अशा अधिकाऱ्याला न्याय्य आणि समुचित वाटेल असा त्यावर आदेश देता येईल : पुनरीक्षण.

परंतु, या कलमाखालील कोणताही अर्ज, जर तो आदेशाच्या तारखेपासून चार महिने मुदतीच्या आत करण्यात आला नसेल तर, दाखल करून घेण्यात येणार नाही.

आणखी असे की, अशा कोणत्याही आदेशाच्या पुनरीक्षणाचा कोणताही अर्ज फेटाळण्यापूर्वी, राज्य शासन किंवा उक्त अधिकारी, अशा फेटाळणीची कारणे नमूद करील.

(२) ज्या आदेशामुळे कोणत्याही व्यक्तीवर प्रतिकूल परिणाम होण्याचा संभव असेल असा कोणताही आदेश राज्य शासनाकडून किंवा यथास्थिती, अशा कोणत्याही अधिकाऱ्याकडून, अशा व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात आली नसेल तर, या कलमान्वये देण्यात येणार नाही.

(३) एखादी व्यक्ती कलम ६ अन्वये अपील करू शकत असेल आणि तिच्याकडून कोणतेही अपील दाखल करण्यात आले नसेल त्याबाबतीत, अशा व्यक्तीच्या अर्जावरून या कलमाखाली कोणतीही कार्यवाही दाखल करून घेतली जाणार नाही.

८. मुंबई न्यायालय फी अधिनियम, १९५९ यात काहीही अंतर्भूत असले तरी, कलम ६ अन्वये दाखल करण्यात आलेल्या अपिलावर किंवा कलम ७ अन्वये करण्यात आलेल्या पुनरीक्षणाच्या अर्जावर, विहित करण्यात येईल अशा किंमतीचा न्यायालय फी मुद्रांक असेल. न्यायालय फी.

भरणा न केलेल्या ऐषआराम कराची वसुली. ९. या अधिनियमान्वये वसुली योग्य असलेला आणि भरणा करण्यात न आलेला कोणताही ऐषआराम कर किंवा शास्ती, जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे, वसूल करता येईल.

नोटीस बजावणे. १०. या अधिनियमाच्या उपबंधांखालील नोटीस, डाकेने पाठवून, किंवा ती ज्या व्यक्तीला उद्देशून असेल त्या व्यक्तीच्या किंवा तिच्या अभिकर्त्याच्या स्वाधीन करून किंवा तिला ती देऊन किंवा विहित करण्यात येईल अशा इतर रीतीने, बजावता येईल.

निरीक्षण करण्याची व अभिलेखांच्या आणि लेख्यांच्या प्रती घेण्याची शक्ती. ११. (१) जिल्हाधिकाऱ्यास, किंवा त्याने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या अन्य व्यक्तीस, या अधिनियमाखालील ऐषआराम कर वसूल करण्यास किंवा तो देण्यास पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या हॉटेलात किंवा व्यवसायाच्या ठिकाणी सर्व वाजवी वेळांमध्ये, प्रवेश करता येईल.

(२) जिल्हाधिकाऱ्यास, किंवा पूर्वोक्तप्रमाणे प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, कोणत्याही वेळी, अशा व्यक्तीस नोटीस देऊन किंवा ती दिल्याशिवाय, तिच्या कामकाजासंबंधीचे अभिलेख आणि लेखे यांची तपासणी करता येईल आणि कोणत्याही विवरणाचा अचूकपणा पडताळण्याच्या प्रयोजनांसाठी, किंवा या अधिनियमाच्या किंवा तदन्वये करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असेल अशा तपशीलाची स्वतःला माहिती असावी यासाठी, उक्त अभिलेख किंवा लेखे यांपैकी कोणतेही अभिलेख किंवा लेखे यांच्या प्रती किंवा त्यामधील उतारे घेता येतील.

या अधिनियमाखाली केलेल्या कार्यवाहीचे संरक्षण. १२. हा अधिनियम किंवा तदन्वये करण्यात आलेले नियम यांद्वारे किंवा तदन्वये सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचा इरादा असलेल्या कोणत्याही गोष्टीसाठी, शासन किंवा शासनाचा कोणताही अधिकारी, यांविरुद्ध कोणताही दावा किंवा खटला किंवा इतर वैध कारवाई दाखल करता येणार नाही.

नियम करण्याची शक्ती. १३. (१) राज्य शासनास, हॉटेलांवरील ऐषआराम कर देण्यात येईल हे सुनिश्चित करण्यासाठी आणि सर्वसाधारणपणे या अधिनियमाचे उपबंध अंमलात आणण्यासाठी, नियम करता येतील.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी शक्तीच्या सामान्यतेस हानी न पोचवता, अशा नियमांत पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींची तरतूद करता येईल :—

(अ) कलम ४ खाली, विवरण ज्या नमुन्यात सादर करण्यात आले पाहिजे तो नमुना, विवरणांबरोबर पुरवावयाची आणखी माहिती आणि विवरणांची पडताळणी ज्या रीतीने करण्यात येईल ती रीत ;

(ब) कलम ५ खाली, त्या कलमान्वये बजावावयाच्या नोटिशीचा नमुना आणि निर्धारणासाठी व निर्धारित देय रकमांच्या वसुलीसाठी अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(क) कलम ६ खाली, त्या कलमान्वये ज्या अपील प्राधिकाऱ्याकडे अपील करता येईल तो अपील प्राधिकारी आणि अपिले निकालात काढण्याची कार्यपद्धती आणि तदनुषंगिक इतर बाबी;

(ड) कलम ८ खाली, अपिलावरील किंवा फेरतपासणीच्या अर्जावरील न्यायालय फी मुद्रांकाचे मूल्य ;

(इ) कलम १० खाली, नोटीस ज्या अन्य रीतीने बजावण्यात येईल ती रीत;

(फ) कलम ११ खाली, निरीक्षणाची आणि अभिलेख व लेखे यांच्या प्रती घेण्याची कार्यपद्धती ;

(ग) या अधिनियमामध्ये तरतूद करण्यात आलेल्या कोणत्याही बाबींसंबंधात द्यावयाची फी; आणि

(ह) विहित करणे आवश्यक असेल किंवा विहित करता येईल अशी इतर कोणतीही बाब.

(३) या कलमाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या नियम करण्यासंबंधीच्या शक्ती, त्यांचा प्रथम वापर करण्यात आला असेल त्याखेरीज, नियम करण्यापूर्वी ते पूर्वी प्रसिद्ध करण्यात येतील या शर्तीस अधीन असतील.

(४) या कलमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधान-मंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीसाठी, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल; आणि ज्या अधिवेशनात तो अशारीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरफार करण्यासंबंधी दोन्ही सभागृहांचे एकमत होईल किंवा नियम करण्यात येऊ नये याविषयी दोन्ही सभागृहांचे एकमत होईल आणि असा निर्णय शासकीय राजपत्रात अधिसूचित करण्यात येईल तर तो नियम अशा अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून केवळ अशा सुधारलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा यथास्थिती, अंमलात येणार नाही; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

(यथार्थ अनुवाद)

वा. म. कुलकर्णी,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई